महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १९९ वा दिनांक : २८/०५/२०२५ वार : बुधवार

## अमित शहांचे नाव घेऊ नका, अडचणीत याल:नारायण राणे



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील पावसाच्या मुद्यावरून महायुती सरकारवर टीकेची झोड उठवल्यानंतर माजी मंत्री खासदार नारायण राणे यांनी त्यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. विशेषतः या प्रकरणी त्यांनी आदित्य यांना अमित शहा यांचे नाव घेतले तर अडचणीत याल असा गर्भित इशाराही दिला आहे.

मुंबईत सोमवारी मुसळधार पाऊस झाला. यामुळे शहरात ठिकठिकाणी पाणी साचले. आदित्य ठाकरे यांनी मंगळवारी या प्रकरणी एका पत्रकार परिषदेद्वारे महायुती सरकारवर टीका केली. या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उल्लेख त्यांनी भ्रष्टनाथ असा केला. यासंबंधी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाही खडेबोल सुनावले. त्यानंतर काही वेळातच नारायण राणे यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर पलटवार करत त्यांना अमित शहांवर टीका करण्यापासून स्वतःला दूर ठेवण्याचा इशारा दिला.

नारायण राणे म्हणाले, तुम्ही अमित शहा यांचे नाव घेऊ नका. अन्यथा अडचणीत सापडाल. संजय राऊत यांच्या नादी लागू नका. ते काही महात्मा नाहीत. ते भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात गेले होते. आता त्यांनी जणू काही मोठ्या संग्रामात जाऊन आल्यासारखे पुस्तक लिहिले आहे. त्याचे काय कौतुक? संजय राऊत तुरुंगात का गेले? हे पाटकर बाईंना विचारा.

नारायण राणे यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. उद्धव ठाकरे यांनी भ्रष्टाचारावर बोलू नये. त्यांच्या परदेशातील गुंतवणुकीची माहिती माझ्यापर्यंत येत आहे. अभिनेता डिनो मोरियाच्या कितीतरी कंपन्या आहेत. केतन कदम मिठी नदी प्रकरणात अटकेत आहे. या कदमचे डिनो मोरियाशी काय संबंध आहेत? माझ्याकडे १९८५ पासूनचे हिशोब आहेत. एकनाथ शिंदे गप्प बसतात. पण आता त्यांनी मातोश्रीपर्यंत पोहोचवलेले आपले पोते काढावे. त्यांनी तसे केले तर उद्धव व आदित्य ठाकरे यांचा आवाज बंद होईल. एकनाथ शिंदे निष्ठावान होते म्हणून काम करत होते.

मंबईत काल मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे सखल भागांत पाणी साचले. कोकणातही पाऊस पडतो. पण तो अर्ध्या तासात समुद्राला मिळतो. मुंबईत जुलै व ऑगस्ट महिन्यात पाऊस पडतो. पण तो आताच पडला. या प्रकरणी सरकारला मदत करायची सोडून हे टीका करत आहरेत. एकनाथ शिंदे यांना नावे ठेवत आहेत. हीच नावे तुम्हाला ठेवली तर? आदित्य ठाकरे यांना साधी मराठीही बोलता येत नाही. तो तोतरा बोलतो. आम्ही त्यांची नक्कल केली तर काय होईल? उद्धव ठाकरे यांची नक्कल केली तर काय होईल? त्यांनी दुसऱ्यांवर आरोप करताना स्वतःला आरशात पहावे, असेही नारायण राणे यावेळी ठाकरेंवर टीका करताना म्हणाले.

गेल्या काही दिवसांपासून शरद पवार आणि अजित पवार हे पुन्हा एकदा एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे. यावरही नारायण राणे यांनी भाष्य केले आहे. शरद पवार कुणासोबतही जास्त टिकत नाहीत. ते अजित पवार यांच्यासोबत आले तर साहजिकच आमचा फायदा होईल. आमचा पक्ष मोठा आहे. आम्ही ठरवू काय आणि कसे करायचे, असे ते म्हणाले.

नारायण राणे यांनी यावेळी ठाकरे बंधू एकत्र आल्याने कोणताही चमत्कार होणार नसल्याचाही दावा केला. ठाकरे बंधू एकत्र आल्याने कोणताही चमत्कार होणार नाही. अशी काय जादू आहे का यांच्याकडे? एकत्र आले म्हणून वीज चमकणार आहे का? दोघांचा हिशोब करा. त्यांनी मराठी माणसाचे काय कल्याण केले? राज व उद्धव हा जर फॉर्म्युला असेल तर त्यांना पाकिस्तान बॉर्डरवर पाठवा. दोन्ही भाऊ एकत्र आले तर विजय विजय मिळेल. काय समीकरण माहीत नाही. दोन्ही भावांची ताकद काय आहे? एकाकडे शून्य आमदार, तर दुसऱ्याकडे २० आमदार. करा प्लस. किती होतात पाहा. काहीही फरक नाही पडणार. ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी चालणार नाही, असे ते म्हणाले.

शिवसेना ही मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी अस्तित्वात आली. आज १६ टक्के मराठी मुंबईत आहेत. पूर्वी ६० टक्के होते. आज १८ ते १९ टक्के आहेत. काय केले शिवसेनेने? हिंदू - हिंदू आता सावरकर - सावरकर. ते मुख्यमंत्री होते तेव्हा राहुल गांधींच्या मांडीला मांडी लावून बसायचे. तेव्हा राहुल गांधी सावरकरांवर टीका करायचे. तेव्हा काही बोलले नाही. आता उद्धव ठाकरे सावरकर - सावरकर करत आहेत, असे ते राणे म्हणाले.

## धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बीड जवळ गढी पुलावर भीषण अपघात

**बीड :** धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बीड जवळ गढी पुलावर एक भीषण आणि विचित्र अपघात झाला आहे. या अपघातात सहा जणांना दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मध्यरात्रीच्या सुमारास हा अपघात घडला असून या विचित्र अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

बंद पडलेली गाडी आणण्यासाठी गेलेल्या गेवराई शहरातील सहा जणांना भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात सहा जण ठार झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी रात्री उशिरा घडली असून सदरील घटना समजताच गेवराई उपजिल्हा रुग्णालयात गर्दी झाली होती. या धडकेत बाळु आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दिपक सरोया, भागवत परळकर, सचिन नन्नवरे यांचा मृत्यु झाल्याचे समजते. हा अपघात धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर गढी कारखान्या समोर उड्डाणपुलावर घडला आहे.

या बाबत मिळालेल्या माहितीनुसार गेवराई शहराजवळ असणाऱ्या गढी पुलावर एक एसयूव्ही वाहनाचा डीव्हाईडरला धडक बसल्याने किरकोळ अपघात झाला होता. या अपघातात कोणीही जखमी झाले नव्हते. मात्र गाडी डिव्हायडरवर अडकली होती. ती गाडी बाहेर काढण्यासाठी सर्वजण प्रयत्न करत असताना महामार्गावरून भरधाव जाणाऱ्या ट्रकने सात जणांना जोरात धडक दिली. यात सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हा अपघात मध्यरात्रीच्या सुमारास घडला असल्याची माहिती आता समोर आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार या अपघातामध्ये बाळु आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दिपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन नन्नवरे यांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी आहे. जखमीवर सध्या उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते. यातील सहा जण हे गेवराई परिसरातील रहिवासी असल्याची माहिती मिळाली असून या घटनेमुळे गेवराईवर शोककळा पसरली आहे.

## निवासी उपजिल्हाधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**छत्रपती संभाजीनगर :** निवासी उपजिल्हाधिकारी यांना लाच घेताना एसीबीने अटक केली आहे. आरडीसी महोदयांनी शेतजमिनीच्या कामासाठी ४१ लाखांची मागणी केली होती. यातील ५ लाख रुपये घेताना एसीबीने निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांना रंगेहाथ ताब्यात घेतले. या कारवाईमुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तक्रारदाराला वर्ग २ ची जमीन वर्ग १ करायची होती. ती करण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी तक्रारदाराकडे मोठ्या लाचेची मागणी केली होती. त्यांनी संबंधिताकडे सदरील काम करून देण्यासाठी ४१ लाख रुपये मागितले होते. त्यातील २३ लाख रुपये संबंधित तक्रारदाराकडून आधीच घेतले होते. मात्र, तरीही १८ लाखांची पुन्हा मागणी करण्यात आली. त्यातील ५ लाख रुपयांची लाच घेताना आरोपीला अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकुनामार्फत ही लाच घेण्यात येत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आरडीसी यांना अटक करण्यात आली.

दरम्यान, महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांत सरकारी अधिकाऱ्यांकडून लाच घेण्याचे प्रमाण वाढल्याचे समोर आले आहे. ग्रामसेवकापासून ते तहसीलदारांपर्यंत अनेकांवर एसीबीने कारवाई केल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत. काही दिवसांपूर्वीच परभणी जिल्ह्यात देखील महिला क्रीडा अधिकारीलाही लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली होती. आता छत्रपती संभाजीनगरमध्ये निवासी उपजिल्हाधिकाऱ्याला अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकून त्रिभुवन यांच्यामार्फत ही लाच घेतली जात होती.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ मे २०२५


## 'सृजन विद्यालय' ही विद्यार्थ्यांच्या पंखाना बळ देणारी शाळा- अश्विनी लाठकर



**बिडकीन :** येथील 'सृजन विद्यालय' ही विद्यार्थ्यांच्या पंखाना बळ देत ग्रामीण भागात उत्तम कार्य करणारी शाळा आहे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांनी केले. त्यांच्या हस्ते सृजन विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.सृजन विद्यालयातील माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ दि. 27 मे रोजी आयोजित करण्यात आला. विद्यालयातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करून गुणपत्रक वाटप करण्यात आले. प्रतिवर्षाप्रमाणे कै. शोभा सोमनाथ जगताप यांच्या स्मरणार्थ जगताप कुटुंबियांकडून विद्यालयातील इयत्ता दहावीत प्रथम येणारे विद्यार्थी कु.समीक्षा अनिल आर्ले व अभिजीत सर्जेराव जाधव यांना प्रत्येकी एक हजार रुपये व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले, तसेच कै. मो. चि. तोटावर यांच्या स्मरणार्थ तोटावर कुटुंबियांकडून किरण दीपक गाडेकर या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यास एक हजार रुपये रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगर माध्यमिक शिक्षण विभाग शिक्षण अधिकारी माननीय अश्विनी लाठकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. हिरु गुरसहानी होते. संस्थेचे सचिव नितीन कंधारकर, नरसिंह कुलकर्णी, मोहन हाडे, डॉ. अंताराम धरपळे, मच्छिंद्र हाडे, मनोज पेरे,जगताप कुटुंबीय, बद्रीनाथ नरवडे, कल्याण राठोड, सय्यद युनूस, राजू वैद्य, दिलीप देवळाणकर, बाबू आगाज आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद सिनकर यांनी केले व आभार राजेंद्र कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक रवींद्र ठाणगे व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.






## खरीप हंगामात खतांची जादा दराने विक्री राजू शेट्टींचा आरोप, कारवाईची मागणी



**पुणे :** खरीप हंगाम तोंडावर आल्याने राज्यामध्ये शेतकरी खते खरेदी करत असताना शेतकऱ्यांना सर्रास लिंकींगची बोगस खताची सक्ती केली जात असून युरिया, पोटॅश, डी ए पी यासारखी खते किमतीपेक्षा जादा दराने विक्री केली जात आहेत. राज्याचे मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांनी फक्त वल्गना करून अधिकाऱ्यांच्या आड शेतकऱ्यांची लुबाडणूक सुरू असल्याची टिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली.

राज्यामध्ये खरीप हंगामाकरिता खताची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. केंद्र सरकारकडून अनुदान घेणा-या खत कंपन्या प्रत्येक जिल्ह्यांमध्ये खताची रेक आल्यानंतर जिल्ह्यातील होलसेल खत विक्रेत्याकडून त्या खतासोबत नॅनो युरियासह सुक्ष्म अन्नद्रव्ये व इतर खताची लिंकीग केली जात आहे. ग्रामीण भागातील खत विक्रेत्याकडे खताच्या पोत्यावरील किमतीपेक्षा जादा दराने खत विक्री होत आहे. विशेषकरून युरिया खताची किंमत 265 रूपये असताना टंचाई दाखवून जवळपास 300 ते 400 रुपयांना विकले जात आहे.

कृषी विभागातील अधिकारी यांचे सदर लिंकीग व जादा दराने होत असलेल्या विक्रीवर कोणाचेच नियंत्रण राहिलेले नाही. राज्य सरकारमधील मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांनी फक्त वल्गना केल्या आहेत. राज्याच्या गुण नियंत्रण विभागाचे या खत कंपन्यांवर कोणतेच नियंत्रण राहिले नसून कृषी विभागातील अधिकारी सर्रास कृषी दुकानदारांकडून हप्ते गोळा करत असून कृषी विभागातील अनेक अधिकाऱ्यांचे खत कंपन्यासोबत भागीदारी व आर्थिक हितसंबंध आहेत. सदर लिंकीग व जादा दराने होणारी खतविक्री थांबविण्यासाठी राज्य सरकारने थेट अनुदानित खताचे रेक आल्यानंतर सदरची अनुदानित खते थेट किरकोळ विक्रेत्यांना देवून खत पुरवठा करण्याबाबतचे धोरण अवलंबवावे लागेल.

राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी कुठेही लिंकीग अथवा छापील किमतीपेक्षा जादा दराने खताची विक्री होत असेल तर संबधित जिल्ह्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी यांना संपर्क साधावे त्यांना खते उपलब्ध करून दिली जातील. मात्र लिंकींगने बोगस खताची खरेदी करू नये असे आवाहन राजू शेट्टी यांना केले आहे.

## अमोल खोतकर एन्काउंटर प्रकरणाला नवे वळण



**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज परिसरातील उद्योजक संतोष लड्डा यांच्या घरी घातलेल्या दरोड्यातील मुख्य आरोपी असलेला अमोल खोतकरचा एनकाऊंटर मध्ये दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मात्र, आता या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. हा एनकाऊंटर सुपारी घेऊन करण्यात आला असल्याचा आरोप आरोपीच्या बहिणीने केला आहे. तर या प्रकरणाची सीबीआय चौकशी करून पोलिसांच्या भूमिकेवर संशय त्याच्या वडिलांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात पोलिसांचा सहभाग असल्याचा आरोप आधीच पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केला होता.

छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज परिसरातील राहणारे उद्योजक संतोष लड्डा यांच्या घरावर दरोडा प्रकरणी मुख्य आरोपी असलेला अमोल खोतकर याचा पोलिसांच्या एनकाऊंटर मध्ये मृत्यू झाला आहे. वडगाव कोल्हाटी परिसरामध्ये रात्री ही चकमक झाली. यामुळे आता या प्रकरणातील सस्पेन्स आणखीनच वाढले आहे. पोलिस दरोडेखोरांच्या मागावर होते. यातील मुख्य आरोपी अमोल खोतकरला पकडण्यासाठी गेल्यावर त्याने पोलिसांच्या अंगावर गाडी घालून पोलिसांनाच मारण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान पोलिसांनी केलेल्या गोळीबारात अमोलचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून पोलिसांकडून देखील अधिक माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचे सांगितले जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ मे २०२५


## महिला आयोगाच्या अध्यक्षांविरोधातच महिला आयोगात तक्रार





**मुंबई :** वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणानंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर सडकून टीका होत असून त्यांच्या राजीनामा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अशातच संगीता भालेराव या महिलेने थेट राज्य महिला आयोगातच रूपाली चाकणकर यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. विशेष म्हणजे, चाकणकरांकडून आपल्याला जीवाला धोका असल्याचा आरोप त्यांनी आपल्या तक्रारीत केला आहे.

दोन दिवसांपूर्वी रुपाली चाकणकर यांच्या समर्थक महिलेने संगीता भालेराव यांना फोन करुन धमकी दिल्याची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनीही ही क्लिप सोशल मीडियावर शेअर करत रूपाली चाकणकरांवर निशाणा साधला होता. आता संगीता भालेराव यांनी या प्रकरणी रूपाली चाकणकरांविरोधात महिला आयोगात तक्रार दाखल केली आहे.

मी चार-पाच दिवसांपूर्वी फेसबुकवर महिला आयोगाला सक्षम नेतृत्वाची गरज आहे, अशा आशयाची पोस्ट लिहिली होती. त्यामुळे रूपाली चाकणकर यांच्या कार्यकर्त्या व त्यांच्या पक्षाच्या पदाधिकारी सोनाली गाडे यांनी चिडून पदाची धमकी देत मला अनेक फोन केले. त्यातील एक फोन मी उचलला असता तिने धमकी व शिवीगाळ केली, असा आरोप संगीता भालेराव यांनी केला. मी कोणत्याही पोस्टमध्ये अथवा कमेंटमध्ये चुकीचा मजकूर लिहिलेला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महिला आयोगाचे काम सुधारावे ही मागणी करणे हा माझा संवैधानिक हक्क आहे व त्याबाबतच मी बोललेले होते, असे भालेराव यांनी म्हटले.

सोनाली अजित गाडे यांच्यावर यापूर्वी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे सोनाली गाडे व हे ज्यांच्यासाठी मला धमकी दिली, त्या रूपाली चाकणकर यांच्याकडून माझ्या जीवितास धोका आहे. त्यामुळे माझी रुपाली चाकणकर, सोनाली गाडे, स्नेहल चव्हाण यांच्या विरोधात तक्रार आहे, असे संगीता भालेराव यांनी म्हटले आहे. सोनाली गाडे यांच्यासोबतच्या संभाषणाची ऑडिओ क्लिप देखील इ-मेलसोबत जोडल्याचे सांगितले आहे.

मी महिला म्हणून तसेच सामाजिक कार्यात सक्रिय असल्याने वैष्णवी हगवणे-कस्पटेसारख्या घटना मनाला हेलावून टाकतात व त्या संवेदनशीलतेमधून मागणी करणे तसेच त्याबाबत विचारणा करणे हे माझ्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहे. मी देखील तेवढेच केले होते, तरीही माझ्या अभिव्यक्तीची गळचेपी सोनाली गाडे या व्यक्तीने करण्याचा प्रयत्न केला आहे. मला धमकावून ती पोस्ट डिलीट करण्यासाठी प्रवृत्त केले, तसेच अन्य ठिकाणी सोशल मिडीयावर मला असभ्य शब्द वापरले धमकी देत शिवीगाळही केली.

महिलांसाठी सर्वात वाईट समजला जाणारा शब्द म्हणजे वांझोटी अशा शब्दांसारखे अनेक क्रूरता स्पष्ट करणारे व महिला म्हणून मला लज्जा उत्पन्न करणारे अपमानित करणारे शब्दप्रयोग त्यांनी केले असल्याने मला मानसिक त्रास झाला आहे. तसेच हे सगळे त्यांनी सोशल मीडियामध्ये केले असल्याने माझी बदनामी देखील झाली आहे. त्या एका राजकीय सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकारी आहेत व त्यांच्या पदाचा त्या गैरवापर करू शकतात असे त्यांनी खुद्द धमकी देत बोलून दाखवले आहे.

## दूषित पाणीपुरवठा प्रकरणी प्रकाश मुंढे सरपंच ग्रामपंचायत किनगाव राजा यांनी घेतली पत्रकार परिषद



**सिंदखेड राजा (महेश मुंढे)** याबाबत सविस्तर वृत्त असे की काही दिवसांपूर्वी ग्रामपंचायत किनगाव राजा यांचे कडून गावात दूषित पाणीपुरवठा होत असून ग्रामस्थांना साथीचे रोग होत असल्याची वृत्त प्रकाशित झाले होते वैद्यकीय अहवालानुसार किनगाव राजा येथे पाणीपुरवठा होत असलेल्या ग्रामपंचायतीचे स्त्रोत व काही खाजगी स्त्रोत हे अशुद्ध व पिण्यास अयोग्य असल्याचे नमूद केले होते त्यानुसार सरपंच प्रकाश मुंढे ग्रामपंचायत किनगाव राजा,उपसरपंच अर्चना दत्तात्रय झोरे,संतोष साहेबराव काकड सदस्य, योगेश चतुर सदस्य, दीपक पडुळकर सदस्य,सखाराम बाबुराव हरकळ सदस्य ग्रामपंचायत किनगाव राजा,चंद्रहास तेजराव खरात आरोग्य सहाय्यक प्राथमिक आरोग्य केंद्र किनगाव राजा यांनी परत सर्व पाण्याचे नमुने हे जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा बुलढाणा येथे पाठवले व स्वतः जलस्त्रोतांची पाहणी केल्याचे सांगितले. पत्रकार परिषदेत बोलताना सरपंच प्रकाश मुंढे यांनी सांगितले की ग्रामपंचायत किनगाव राजा आरओ फिल्टर एटीएम मशीन बसवून किरकोळ दरात आरओ चे पाणी उपलब्ध करून दिलेआहे दिनांक २५ मे २०२५ रोजी आरो एटीएम मशीनला जंतुनाशक किट बसवण्यात आले आहे व आरोग्य विभागाकडून विहीर जलशुद्धीकरण देखील करण्यात आले आहे त्यामुळे यापुढे नागरिकांनी कुठलीही भीती बाळगू नये व कुठलीही शंका असल्यास थेट ग्रामपंचायत किनगाव राजा येथे संपर्क करावा. ग्रामसेवक अमोल पुंजाजी मेहेत्रे यांनी सांगितले की किनगाव राजा येथे पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व जलस्त्रोतांचे जलशुद्धीकरण करण्यात आले आहे व परत सर्व पाण्याचे नमुने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा बुलढाणा येथे पाठवले आहेत नागरिकांनी कुठलीही भीती बाळगू नये पाण्याच्या नमुन्याचे अहवाल आल्यानंतर परत पाण्याचे आरओ फिल्टर एटीएम मशीन हे सुरू करण्यात येईल. यावेळी किनगाव राजा येथील स्थानिक शेख नईमुद्दीन शेख हयात यांनी सांगितले की ग्रामपंचायत किनगाव राजा यांनी बसवलेले पाण्याचे एटीएम चे पाणी आम्ही घरातील सर्व लहान मोठ्यांनी पिले आहे आम्हाला कुठलाही त्रास किंवा आजार झाला नाही ग्रामपंचायत ने लवकरात लवकर आरओ मशीन सुरू करावे. मधुकर प्रल्हाद साळवे यांनी सांगितले की आम्हाला या पाण्यामुळे कुठलाही आजार किंवा त्रास झालेला नाही उलट आम्ही ग्रामपंचायत किनगाव राजा यांचे आभार मानतो की त्यांनी शुद्ध पाण्याचे एटीएम सुरू करून अगदी किरकोळ दरात पाणी उपलब्ध करून दिले. पवन कुलकर्णी यांनीही ग्रामपंचायत किनगाव राजा यांनी शुद्ध पाण्याचे मशीन उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार मानले व नागरिकांनी पाण्याबद्दल कुठलीही भीती बाळगू नये असे सांगितले. जलशुद्धीकरण केल्यानंतर पाण्याचे नमुने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा बुलढाणा येथे पाठवले आहेत लवकरच अहवाल प्राप्त होईल व त्यानंतर लगेच आरओ पाण्याचे फिल्टर एटीएम मशीन सुरू होईल असे सरपंच प्रकाश मुंढे ग्रामपंचायत किनगाव राजा यांनी सांगितले. यावेळी पत्रकार परिषदेसाठी स्थानिक नागरिकही उपस्थित होते सर्वांनी ग्रामपंचायत किनगाव राजा यांना आरओ चे फिल्टर एटीएम मशीन लवकरात लवकर सुरू करण्याची विनंती केली.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ मे २०२५

# लाठी काठी व दांडपट्टा स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याचा दिल्लीत वर्चस्व




**मुरुम : (प्रा. सुधीर पंचग्गले)** दिल्ली येथे आयोजित २ री नॅशनल इंडोर मार्शल आर्ट गेम्स व पहिली लाठी फेडरेशन कप, अग्रवाल भवन बुद्ध विहार न्यू दिल्ली येथे २२ व २५ मे २०२५ यादरम्यान आयोजित स्पर्धेत विविध राज्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला यामध्ये धाराशिव जिल्ह्याच्या खेळाडूंनी लाठी व दांडपट्टा या क्रीडा प्रकारात घवघवीत यश संपादन केले. गुरुकुल प्रायमरी इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थी ८ वर्षाखालील मुले गटात देवांश चिलोबा एकम लाठी व द्वे लाठी या खेळ प्रकारात १ सुवर्ण पदक, २ रोप्या पदक, व दांडपट्टा मुक्त शैली या क्रीडा प्रकारात १ सुवर्णपदक, १० वर्षा खालील मुले मोरया गौतम विधाते २ सुवर्ण पदक, राजवीर बळीराम चौधरी एकम लाठी २ कांस्य पदक दांडपट्टा मुक्तशैली या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक, समर्थ सुनिल बायस एकम लाठी १ रोप्या पदक, कांस्यपदक व द्वे लाठी कांस्यपदक या खेळ प्रकारात, १२ वर्षाखालील मुले गणेश विकास पाटील एकम लाठी स्वर्ण पथक व कांस्यपदक, नवाज चांदपाशा मुर्शिद क्रीडा प्रकार एकम लाठी रौप्य पदक, आर्यन व्यंकट जाधव क्रीडा प्रकार द्वे लाठी स्वर्ण पदक, कास्यपदक व फेडरेशन कप रोप्य पदक, १४ वर्षाखालील मुले श्रेयस धर्मेंद्र मोरे क्रीडा प्रकार एकम लाठी कांस्यपदक फेडरेशन कप, आयुष युवराज पवार क्रीडा प्रकार एकम लाठी १ सुवर्णपदक फेडरेशन कप कांस्यपदक व दांडपट्टा मुक्तशैली या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक, अनुज विक्रम सूर्यवंशी क्रीडा प्रकार एकम लाठी २ स्वर्ण पदक व दांडपट्टा मुक्तशैली या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक, १६ वर्षाखालील मुले साहिल महंमदरफी शेख क्रीडा प्रकार एकम लाठी, द्वे लाठी स्वर्ण पदक व रोपे पदक व दांडपट्टा मुक्तशैली या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक, १८ वर्षाखालील मुले शिवशंकर शंकर आगलावे लाठी क्रीडा प्रकार काठपवित्रा महरुम २ कांस्यपदक, आयान महंमदरफी शेख दांडपट्टा क्रीडा प्रकार मुक्तशैली सुवर्णपदक, ८ वर्षाखालील मुली आरोही बलभीम पटवारी क्रीडा प्रकार द्वे लाठी रोप्य पदक, आराध्या संतोष शेटगार क्रीडा प्रकार एकम लाठी सुवर्णपदक व रोप्य पदक, लाव्या नागनाथ वाघमारे क्रीडा प्रकार एकम लाठी स्वर्ण पदक व दांडपट्टा क्रीडा प्रकार मुक्तशैली सुवर्णपदक, प्रत्युषा प्रवीण सोमवंशी क्रीडा प्रकार द्वे लाठी कांस्यपदक,.१२ वर्षाखालील मुली स्वरा विलास पाटील क्रीडा प्रकार एकम लाठी कांस्यपदक. आराध्या प्रभाकर जाधव क्रीडा प्रकार द्वे लाठी स्वर्ण पदक व दांडपट्टा क्रीडा प्रकार मुक्तशैली सुवर्णपदक, ईश्वरी राहुल चिलोबा दांडपट्टा क्रीडा प्रकार मुक्तशैली सुवर्णपदक, १६ वर्षाखालील मुली लाठी क्रीडा प्रकार पंचआनिक अनन्या मारुती पांगे, श्रेया जितेंद्र अंकुशे, ईश्वरी प्रकाश माने, अफसाना लाडले मशाक नदाफ, श्रेयशी त्रिमूर्ती शिंदे २ स्वर्ण पथक भाग्यश्री केदारनाथ पवार क्रीडा प्रकार लाठी कटपवित्र स्वर्ण पदक व द्वे लाठी कांस्यपदक. श्रुती विनोद जाधव क्रीडा प्रकार एकम व द्वे लाठी सुवर्णपदक. या स्पर्धेत विद्यार्थ्यांना पदक व प्रमाणपत्र मार्शल आर्टस् गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया चे सचिव व दिल्ली ऑलम्पिक चे सहसचिव दीपक अग्रवाल, लाठी इंटरनॅशनल चे फाउंडर सुभाष मोहिते, लाठी इंडियाचे अध्यक्ष अजय शहा यांच्या उपस्थितीत मिडलवर प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आला.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा अभिनंदन गुरुकुल इंग्लिश स्कूलचे सचिव आनंद चौधरी, जिल्हा परिषद उमरगाचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे, रामानुजन इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष महेश अंबर, उस्मानाबाद जिल्हा लाठी असोसिएशनचे अध्यक्ष अमोल पाटील व सर्व पालकांनी अभिनंदन केले, विद्यार्थ्यांसोबत उस्मानाबाद जिल्हा दांडपट्टा असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर प्रीती चिलोबा, गुरुकुलच्या मुख्याध्यापिका सौ मयुरी चौधरी, टीम कोच गौतम विधाते, टीम मॅनेजर आदिनाथ गोरे, ऑफिशियल वजीर शेख, धनराज तेलंग, लाठी इंडिया चे डायरेक्टर महंमदरफी शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

# नाशिकमध्ये बहिणीला प्रपोज केल्याच्या रागातून खून




**नाशिक :** बहिणीला प्रपोज करतोस?" या कारणावरून चार जणांनी मिळून एका युवकाला बेदम मारहाण केली. यात गंभीर जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सोमवारी (दि. २६) रात्री ९ वाजता शिवाजीनगर परिसरातील दत्त मंदिर रोडवर ही घटना घडली. नसीम शहा (वय १९, रा. कार्बननाका, शिवाजीनगर) असे मृत युवकाचे नाव आहे.

घटनेनंतर गंगापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. या प्रकरणातील संशयित अद्याप फरार असून, पोलिसांकडून शोधमोहीम सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, नसीम शहा दत्त मंदिर रोडने जात असताना संशयित आदित्य वाघमारे व त्याचे तीन साथीदार याने त्याला अडवले. "बहिणीला प्रपोज करतोस का?" असे विचारत चौघांनी मिळून त्याला रस्त्यावरच बेदम मारहाण केली. मारहाणीत नसीम खाली कोसळला आणि डोक्याला गंभीर मार लागला. त्यानंतर नागरिकांनी त्याला तत्काळ सिव्हिल रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून, आरोपींच्या शोधासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे. आरोपी अजूनही फरार असल्यामुळे नागरिकांमध्ये चिंता आहे.

या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी पोलिसांनी प्रेमप्रकरण किंवा मुलीच्या छेडछाडीच्या वादातून ही हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. सध्या गंगापूर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २८ मे २०२५

# गुंठेवारी सवलत पूर्वी सारखीच ठेवा मनपाचे उत्पन्न हजार कोटीच्या पुढे जाईल -राजेंद्र दाते पाटील

## जाचक साइड मार्जिन दंड कारवाई रद्द करून सातबारा-पी आर कार्ड द्या



**प्रतिनिधी**-छत्रपती संभाजीनगर मनपा क्षेत्रात मनमानी पद्धतीने आकारण्यात येणारी गुंठेवारी शुल्क रद्द करून साइड मार्जिन मधील जागा न सोडल्यास दहा टक्के दंड करणारी कारवाई तात्काळ मागे घेण्याचे निर्देश व्हावे आणि गुंठेवारी प्रमाणपत्र धारकांच्या नावे सातबारा व पी आर कार्ड वर नोंद घेऊन या मालमत्तेवर बांधकाम व इतर आवश्य नियमाधीन कर्ज उपलब्ध व्हावे अशी लोकहिताची मागणी दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी निवेदन देऊन केली आहे.त्यांनी एक अभ्यासु असे सविस्तर निवेदन सादर केले आहे. या पुर्वी मान्य केलेली मनपा गुंठेवारी रेडी रेकनर दरात ५० टक्के सवलत सुविधा कायम ठेवावी,रेडिरेकनर दराच्या प्रमाणात शंभर टक्के शुल्क आकारण्यात येत असल्याने गुंठेवारीला मिळणारा प्रतिसाद कमीच होताना दिसत आहे. पालिकेने पूर्वीप्रमाणे रेडिरेकनर दराच्या किमान ५० टक्के सवलत देण्याचे आदेश जनहितार्थ निर्गमीत व्हावेत अशी मागणी त्यांनी केली असुन सविस्तर असे सोळा मागण्या त्यांनी लेखी स्वरूपात केल्या आहेत. पूर्वीप्रमाणे सवलत जाहिर केल्यास गुंठेवारी नियमिती करणाला प्रतिसाद मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.९ जुलै २०२१ गुंठेवारी भागा तील मालमत्ता नियमितीकरणा साठी नगररचना विभागाने ५१ वास्तू विशारदांचे पॅनल नेमले होते, या वास्तू विशारदां मार्फत येणाऱ्या संचिका स्विकारल्या जातहोत्या. दीड हजार चौरस फुटांच्या आतील बांधकामांना नियमित करण्यासाठी सुरूवातीला रेडीरेकनर दराच्या ५० टक्के दर आकारण्यात आला होता त्यामुळे शहरातील गुंठेवारी भागातील मालमत्ता धारकां कडून नियमिती करणाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता मात्र नंतर रेडीरेकनर दराची ही सुट टप्प्याटप्प्याने कमी करण्यात आली. आता तर वास्तू विशारदांचे पॅनल देखील नसुन मे २०२२ नंतर १००टक्के रेडीरेकनर दरआकारण्यात येत आहेत. यामुळे गुंठेवारी नियमिती करणाला मिळणारा प्रतिसाद घटतच गेला असुन संचिका दाखल होण्याचे प्रमाणही कमी झाले आहे जुनी पद्धत व सवलत देण्याचे निर्देश तत्काळ जारी करून सुधारीत शासनादेश जारी व्हावा अशी मागणी करण्यात आली आहे.सध्याची स्थिती विचारात घेणे आवश्यक असुन गुंठेवारी साइड मार्जिनच्या दंडा पोटी १०% अधिक भुर्दंड मोकळ्या प्लॉटच्या जमीन शुल्कात १ टक्का सूट शासन निर्णयानुसार या वर्षापासून मोकळ्या जागा,घरे नियमित करण्यासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २०२१ नुसार शुल्क भरून नियमित केली जात आहे. ६०० स्क्वेअर फूट क्षेत्रा वरील घर गुंठेवारी करताना सुमारे २७ हजार रुपयांची वाढ झाली असुन हा भुर्दंडच आहे.मनपा आयुक्तांनी शुल्क कमी करण्या ऐवजी शुल्का मध्ये दंड आकारून वाढ केली आहे या मुळे ही बाब जनविरोधी ठरत असून महानगर पालिका क्षेत्रात भूखंड विकासा साठी आणि इतर बांधकामांच्या परवानग्यां साठी सुधारित शुल्क आकारणी केली असल्याची बाब सुद्धा जनते मध्ये नाराजी पसरवणारी आहे. ६०० चौ.फुटाचा प्लॉटच्या समोरील बाजूच्या १० फूट आणि मागील बाजूने ५ फूट अशी एकूण २४५ चौ. फूट मार्जिनची जागा सोडणेअनिवार्य करणे म्हणजे मुळातच जागा कमी त्यात या अटी सर्व सामान्य गोरगरीब जनतेवर अन्याय कारक ठरत आहे.यात आश्चर्य म्हणजे प्रशमन शुल्क आदी घटकां नुसार दर आकारण्यात येत आहे.या सुधारणे नुसार ६०० स्क्वेअर फूट क्षेत्रासाठी वार्षिक बाजार मूल्या नुसार शुल्क निश्चित करण्यात आले आहे हे करणे देखील अन्यायच ठरला आहे. त्यामुळे ४एप्रिल २०२५ पासून मनपा मध्ये दाखल झालेल्या गुंठेवारी प्रस्तावाच्या चलनामध्ये अन्याय कारक अशी मोठी वाढ झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे मनपा क्षेत्रात या मालमता बाबत नागरिकांना ७/१२ नोंदी ना पी आर कार्ड नोंदी घेऊन ते तात्काळ देण्यात यावेत. मनपा क्षेत्रात ०१ ते १५०० ते २००० वर्ग फुटांच्या मोकळ्या जागेचे गुंठेवारी करतांना नाम मात्र शुल्क आकरावे.गुंठेवारी करतांना जुने दस्तावेज तथा जुन्या नोंदणीचे (रजिस्ट्रीचे) दस्तावेज या सह नव्याने करण्यात आलेले दस्तावेज यांना सुद्धा ग्राह्य मानून त्याची खरेदी विक्री कायदेशीर असल्याचे उल्लेख असावा तसेच सर्वच बांधकाम नसलेले ओपन प्लॉटची गुंठेवारी करतांना नाममात्र शुल्क आकारून त्यांना गुंठेवारी प्रमाणपत्र द्यावीत आणि मनपाचे बांधकाम शुल्क बांधकाम परवानगी घेताना आकारावे हा सुद्धा या सुधारीत शासन निर्णया मध्ये उल्लेख असावा अशी स्पष्ट मागणी शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी करतांना वित्तीय संस्थानी सुद्धा याच प्रमाणपत्रा वर पात्र अर्जदारांना कर्ज तथा पत पुरवठा करावा असा व या बाबींचा सुद्धा स्पष्ट उल्लेख असावा आणि या प्रमाणे नवा शासनादेश निर्गमीत होऊन मागणी जनहितार्थ तत्काळ मंजुर करून तसे नवे शासन निर्णय त्वरित जारी करून सर्व सामान्य गोरगरीब जनतेला न्याय द्यावा अशी मागणी पत्रात नमुद केले आहे.

# जूनमध्ये सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडेल - हवामान विभाग

**नवी दिल्ली :** भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) मंगळवारी सांगितले की, जून महिन्यात देशात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे, जो दीर्घकालीन सरासरीच्या (LPA) 108 टक्के असू शकतो.

हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा म्हणाले की, मध्य आणि दक्षिण भारतात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. वायव्य भारतात सामान्य पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर ईशान्य भारतात सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो.

अर्थ सायन्स मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन म्हणाले की, चालू हंगामात मान्सूनच्या मुख्य क्षेत्रात सामान्यपेक्षा जास्त (दीर्घ कालावधीच्या सरासरीच्या 106% पेक्षा जास्त) पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. आजपासून भारत फोरकास्ट सिस्टीमचा वापर केला जाईल असेही त्यांनी सांगितले.

मान्सूनच्या मुख्य क्षेत्रात मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा आणि लगतच्या प्रदेशांचा समावेश होतो. बहुतेक पाऊस नैऋत्य मान्सून दरम्यान पडतो आणि हा प्रदेश शेतीसाठी मान्सूनच्या पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो.

याचा अर्थ असा की, आयएमडीने 1971-2020 या कालावधीच्या आधारे नैऋत्य मान्सूनसाठी दीर्घकालीन सरासरी (एलपीए) 87 सेमी (870 मिमी) निश्चित केली आहे. जर वर्षभरात 87 सेमीपेक्षा जास्त पाऊस पडला तर तो सामान्यपेक्षा जास्त मानला जातो. जर ते कमी असेल तर तो कमकुवत मान्सून मानला जातो.

भारत सरकारने आज प्रगत भारत फोरकास्ट सिस्टीम (BFS) लाँच केली. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी ते देशाला सुपूर्द केले. ही प्रणाली पंचायत पातळीपर्यंत आपत्ती व्यवस्थापन, शेती, पाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुरक्षेत मदत करेल.

बीएफएस प्रणाली पूर्वीपेक्षा अधिक अचूक आणि मिनिट-टू-मिनिट हवामान माहिती प्रदान करेल. हे पुण्यातील भारतीय उष्णकटिबंधीय हवामान आणि हवामानशास्त्र संस्थेने (IITM) तयार केले आहे.

